# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/09/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०३ किमी अंतरावर एस. के. बॅंक उमरेडचे समोरुन दिनांक २९/०९/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— दिलीप तुकारामजी बावनकर, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ६ रिलायंन्स टॉवर जवळ कावरापेठ उमरेड हा गांगापुर येथे त्याचे पानठेल्यावर हजर असता विलास वांगे त्याचे पानठेल्यावर आला तेव्हा त्याने फिर्यादीला एस के बॅंक उमरेड येथे जायचे आहे असे म्हणुन फिर्यादीला त्याची मोटार सायकल मागीतली यावरुन फिर्यादीने विलास वांगे यास त्याची मोसा क्र एम. एच.— ४०/के.—६२८६ किंमती १५,०००/—रु. ही दिली तेव्हा विलास वांगे हा मोटार सायकल परत न घेवुन आल्याने फिर्यादी दुपारी ०२/०० वा. सुमारास एस के बॅंक तिरुपती शोरुमचे बाजुला उमरेड येथे जावुन विलास वांगे यास भेटले असता त्याने फिर्यादीला सांगीतले कि ''मी आज सकाळी ११/४५ वा. सुमारास एस. के. बॅंक समोरील बादामचे झाडाखाली तुझी मोटार सायकल उभी करुन बॅंकेत गेलो व बॅंकेतील काम संपवुन मोटरसायकल उभी केलेल्या ठिकाणी परत आलो असता मोसा क्र. एम. एच.— ४०/के—६२८६ ही उभी दिसली नाही'' यावरुन फिर्यादी व विलास वांगेनी मिळुन शेजारी तसेच गावात मोटरसायकलचा शोध घेतला परंतु मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने मोटरसायकल चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक विनोद भोयर मो. नं. ७८४१९३४३२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर